जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक २९.११.२०२४**

# गहाळ झालेले ५२ मोबाईल फोन ३ महिन्यात शोधुन नागरिकांना परत

महात्मा फुले चौक पोलीस ठाणे, हद्दीत अनेक मोबाईल गहाळ झालेबाबतच्या तक्रारी नागरीकांनी दिल्याने त्याबाबत तपास करून गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेणे बाबत श्री.ज्ञानेश्वर साबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी पथक स्थापन करून मार्गदर्शक सुचना दिल्या होत्या. त्यानुसार पोशि/२१६६ विजय कोळी यांनी गहाळ झालेल्या मोबाईल फोनची माहिती तात्काळ सी.ई.आय.आर पोर्टलवर अपडेट करून सातत्याने त्याचा पाठपुरावा व तांत्रीक विश्लेषण करून तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांचे मदतीने मागील तीन महिन्याचे कालावधीत एकुण ५,८८,५००/-रूपये किंमतीचे ५२ गहाळ झालेल्या मोबाईल फोनचा शोध घेतला आहे. सदर मोबाईल फोन हे मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग कल्याण, श्री.संजय जाधव, श्री.अतुल झेंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, कल्याण, ठाणे शहर यांचे हस्ते मोबाईलच्या मुळ मालकांना परत देण्यात आले आहेत.

सदरची कारवाई श्री.ज्ञानेश्वर साबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विजय नाईक, पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री.सोपान नांगरे, पोलीस निरीक्षक (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/स्वप्नील भुजबळ, पोउपनि/विकास मडके, पोहवा/३८६५ चित्ते, पोना/७०८३ कांगरे, पोशि/२१६६ विजय कोळी, पोशि/३०९३ दिपक थोरात, पोशि/४१९१ श्रीधर वडगावे यांनी केली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर